# ग्रामपंचायत कार्यालय लवारी

## पंचायत समिती साकोली जिल्हा परिषद भंडारा

## ई–टेंडर नोटीस क.1/2026–27

### जावक क.ग्रा.प.लवारी /बांधकाम साहित्य इ.नि/1/2026–27 दि. 14/05/2026

### ग्रामपंचयत लवारी येथे बांधकाम साहित्य पुरवठा करणे बाबत

ग्रामपंचायत **लवारी** येथे बांधकाम साहीत्य पुरवठा करण्याकरीता वस्तु व सेवा कर कायदयान्वये पजिंकृत पुरवठा धारका कडून **दोन लिफाफा पध्दतीने** ई निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाची संपूर्ण प्रकीया ऑनलाईन पध्दतीने करण्यात येईल. सदर निविदे संबधी या पुढील सर्व सुचना/शुध्दीपत्रक ईत्यादी ईटरनेट च्या उपयोगाने ऑनलाईन करण्यात येईल वरील निविदे बाबत संपूर्ण माहिती शासनाच्या www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर दि**-14/05/2026** रोजी **3.00** वाजता पासून ते दि**-21/05/2026** रोजी **3.00** वाजे पर्यंत निविदा डाउनलोड करून भरता येईल. निविदा उघडण्याची वेळ दि. **22/05/2026** रोजी दुपारी **3.00** वाजता

### निविदे बाबतच्य आवश्यक बाबी :–

**1.**निविदा प्रपत्र फी रक्कम रूपये 500/– (अक्षरी पाचशे रूपये फक्त ) **नापरतावा** व अनामत रक्कम रूपये 3000 /–(अक्षरी **तीन** हजार रूपये) तसेच महाराष्ट्र शासनाच्या महाटेंडर प्रणालीचे 500 रुपये ऑनलाईन निविदा धारकाला सादर करावी लागेल.

**2.**सदर निविदा फी, अनामत रक्कम **ई निविदा ग्रामंपचायत लवारी** ह्या ई निविदा बॅक खाते मध्ये internet Binking द्वारे जमा करावे निविदा मंजूर पुरवठाधारक यांची रक्कम निविदा कालावधी संपेपर्यंत पर्यंत ग्रा.प. कडे जमा राहिल

**3.**सदर कामाचे आवश्यक अटी व शर्ती निविदे सोबत नमुद केलेले आहे.

**4** कोणत्याही निविदा अंशतः अथवा पुर्णतः स्वीकारण्याच्या अथवा नाकारण्याच्या अधिकार सरपंच व ग्रामविकास अधिकारी लवारी यांनी राखुन ठेवण्यात आलेला आहे.

सरपंच
ग्रामपंचायत लवारी
पंचायत समिती साकोली

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत लवारी
पंचायत समिती साकोली

# ग्रामपंचायत कार्यालय लवारी
## पंचायत समिती साकोली जिल्हा परिषद भंडारा
## ई–टेंडर नोटीस क्र.1/2026–27
## जावक क्र.ग्रा.प.लवारी /बांधकाम साहित्य इ.नि/1/2026–27 दि. 14/05/2026
## ग्रामपंचयत लवारी येथे बांधकाम साहित्य पुरवठा करणे बाबत
## निविदे संबधी आवश्यक अटी व शर्ती

**1.**निविदा प्रक्रिया ही ई निविदा प्रक्रीये ने करण्यात येणार असल्याने त्यामध्ये तांत्रीक लिफाफा क्र.1 (Technical Bid) मध्ये खालील दस्ताऐवज ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.

**2.** सदर निविदा फी, अनामत रक्कम **ई निविदा ग्रामंपचायत लवारी** ह्या ई निविदा बॅक खाते **मध्ये** internet Binking **द्वारे पुढील प्रमाणे जमा करावे** निविदा प्रपत्र फी रक्कम रूपये 500/- (अक्षरी पाचशे रूपये फक्त ) **नापरतावा** व अनामत रक्कम रूपये 3000/–(अक्षरी **तीन** हजार रूपये) तसेच महाराष्ट्र शासनाच्या महाटेंडर प्रणालीचे 500 रुपये जमा करावे त्याची पावती लिफाफा क्र.1 सोबत सादर करावी.

**2.1** निविदा धारकाने पॅनकार्ड, आधारकार्ड निविदा धारकाने अपलोड करावे निवीदा प्रपत्रा सोबत स्वतःचा लेटरपॅड जोडून त्यावर आपले नाव ईमेल आयडी तसेच मोबाईल क्र. लिहून ते अपलोड करावे. निविदा धारकाने दुकाने अधिनियम अंतर्गत प्राप्त झालेले उघोग आधार ऑनलाईन निविदेसोबत सादर करावे.

**2.2** व्यवसाय कर प्रमाणपत्र व 2021-22,2022-23,2023-24,2024-25,2025.26 चा निपटारा केल्याचे Clearance Certificate तसेच GST प्रमाणपत्र जोडावे. पुरवठा धारकाचे नाव शासनाच्या कोणत्याही विभागामध्ये काळया यादीत नाही याबाबत अद्यावत 500 रुपयाच्या स्टॅम्पपेपर वर प्रतिज्ञालेख नोटरीसह सादर करावा.

**2.3** निविदेतील नमुद अटी शर्ती मान्य असल्याचे निविदा धारकाचे डिजीटल स्वाक्षरी केलेली प्रत जोडावी. भंडारा जिल्हयातील दोन अथवा दोन पेक्षा जास्त ग्रामपंचायतीला साहित्य पुरवठा केल्याचे ग्रामपंचायती चे प्रमाणपत्र सादर करावे.

**3.**लिफाफा क्र.02 (Financial Bid ) मध्ये कंत्राटदाराने सर्व साहित्याचे दर सर्व करासहीत एकत्रीत पणे नमुद करून ऑनलाईन अपलोड करावे.

**4.**पुरविण्यात येणाऱ्या सर्व साहित्याची विक्रीकर, आयकर व शासनाचे इतर करभरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. निविदा धारकाने निविदा ज्या दरामध्ये सादर केलेली आहे. त्याच दरामध्ये निविदा धारकाने साहित्य पुरवठा करावे लागेल.निविदेतिल साहित्याच्या दरानुसार साहित्य पुरवठा न केल्यास त्या पुरवठा धारकाचे नाव काळ्यायादित समाविष्ठ करण्यात येईल कोणत्याही प्रकारची हयगय साहित्य पुरवठा करतानी करण्यात येवू नये. अथवा कोणताही विलंब करण्यात येवू नये.

**5.**सदर अटी बाबत कोणत्याही नियमाचा भंग झाल्यास होणाऱ्या दंड शिक्षेस पुरवठाधारक स्वतः जबाबदार राहील.

**5.1.**तांत्रीक लिफाफा क्र 1 मध्ये जोडलेले आवश्यक कागदपत्रे व व्यापारी लिफाफा क्र.02 मध्ये नमुद केलेले साहित्याचे दर यांचे मुल्यमापन करून निविदा स्विकारण्याचे अथवा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार ग्रामपचांयत लवारी यांना राखीव आहेत.

**6.**निविदा प्रपत्र फी व अनामत रक्कम संबधीत ग्रामपंचायतीच्या बॅकेच्या ई निवीदा खात्यावर जमा होणे आवश्यक आहे. अन्यथा सदर रक्कम बाबत वा ऑनलाईन अपलोड केलेल्या पावतीचा विचार न करता सदर निविदा धारकाचे तांत्रीक लिफाफा क्र.01 रदद करण्यात येईल. सदर बाबत संपुर्ण जबाबदारी निविदा धारकाची राहील.

**7.**दि. **14/05/2026** रोजी **3.00** वाजेपासून दि. **21/05/2026** ला **3.00** वाजे पर्यंत निविदा डाउनलोड तसेच भरता येईल.

**8.** निविदा उघडण्याची वेळ दि. **22/05/2026** रोजी दुपारी **3.00** वाजता ग्रामपंचायत **लवारी** येथे उघडण्यात यईल. अथवा ग्रामपंचायतीच्या सोईनुसार उघडण्यात येईल.

**9.** निविदेतील साहित्याचे दर हे निविदा प्राप्त झालेल्या तारखे पासून दिनांक **31/03/2027** (सन 2026–2027) पर्यंत लागू राहतील.

**10.**पुरवठा धारका कडून समाधानकारक साहित्याचा पुरवठा न होताना आढळल्यास मंजुर निविदा रदद करण्याचा अधिकार ग्रामपंचायत लवारी याना राहिल तसेच निविदा अनामत रक्कम परत करण्यात येणार नाही.

**11.** निविदा मंजुर झालेल्या पुरवठाधारका ला आदेशपत्र देण्यापुर्वी 500/–च्या स्टॅम्प पेपर वर विहीत नमुण्यात करारनामा करून देणे बंधन कारक राहील.

**12.**पुरवठा धारकाने पुरविलेल्या साहित्याचे देयक निधीचे उपलब्धते नुसार अदा करण्यात येतील. मात्र कोणत्याही प्रकारचे अग्रीम दिले जाणार नसुन देयकाच्या विलंबास कोणतीही व्याजाची किंवा जादाची रक्कम पुरवठा धारकास देय असणार नाही. तसेच पुरवठा धारकास मागणी करण्याचा अधिकार राहणार नाही. प्रयोगशाळा चाचणी अहवाला नुसार साहित्याची चाचणी नकारात्मक (Negative) किवा गुणवत्ता पूर्वक न आढळल्यास त्या साहित्याची रक्कम ग्रामपंचायत कडून देय असणार नाही.

**13.**निविदेतील सर्व अटी व शर्ती पुरठाधारकास बंधनकारक राहतील. वरील सर्व अटी व शर्ती आम्ही वाचले असून त्या मान्य आहेत. व ग्रामपंचायत कार्यालयाने मागीतलेल्या अटी व शर्ती नुसार सर्व कागदपत्रे व अटी शर्तीच्या आधीन असल्यासच पात्र करण्यात यावे. नमुद कागदपत्रा पैकी **एक** सुध्दा कागदाची पुर्तता नसल्यास माझी निविदा फेटाळण्यास हरकत नसावी.

| | | |
|---|---|---|
| **1** | निविदा **फॉर्म** फी रक्कम रूपये | रु.500/-(रु.पाचशे फक्त) नापरतावा NET BANKING द्वारेच<br>UTR No.............................. दिनांक ........................... |
| **2** | महाराष्ट्र शासनाच्या महाटेंडर प्रणालीचे (ऑनलाईन पोर्टल अप्लिकेशन फी) | रु.500/-(रु.पाचशे फक्त) नापरतावा NET BANKING द्वारेच |
| **3** | जमा करावयाची अनामत रक्कम | रु.3000/- (रु.तीन हजार फक्त) NET BANKING द्वारेच<br>UTR No............................... दिनांक .......................... |

निविदा धारकाची डिजीटल स्वाक्षरी-

निविदा धारकाचे संपूर्ण नाव........................................................
संपर्क पत्ता व मोबाईल क्र........................................................

सरपंच
ग्रामपंचायत लवारी
पंचायत समिती **साकोली**

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत लवारी
पंचायत समिती **साकोली**

Signature Not Verified
Digitally signed by HOMESHWAR SHRIRAM LANJE
Date: 2026.05.14 14:11:23 IST
Location: Maharashtra-MH